प्रेसनोट

दिनांक २०/१०/२०२६ रोजी सातारा शहरामध्ये दुर्गामाता विसर्जन तसेच शाही सिमोल्लंघन सोहळा साजरा होत असून विविध सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळांकडून दुर्गामाता विसर्जन केले जाते ते पाहण्यासाठी ग्रामीण व शहरी भागातून नागरीकांची तसेच वाहनांची देखील मोठ्या प्रमाणात गर्दी होते. लोकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून तसेच वाहतूकीची कोंडी होऊ नये, अपघात घडू नये अथवा कोणताही अनुचित प्रकार होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी दि. २०/१०/२०२६ रोजी सकाळी १०:०० वा. पासून ते २१/१०/२०२६ चे सकाळी ०७:०० वा. पर्यंत सातारा शहरातील अंतर्गत वाहतूकीचे मार्गात खालील प्रमाणे बदल करणेत येत आहे.

अ) दैनंदिन वाहतूकीचे बंदी घालण्यात येणारे मार्ग :-

१) राजपथावर कमानी हौद देवी चौक मारवाडी चौक मोती चौक पर्यत येणारे जाणारे सर्व वाहनांना प्रवेश बंद. -

२) कमानी हौद ते शेटे चौक पर्यंत येणारे जाणारे सर्व वाहनांना प्रवेश बंद.

३) कर्मवीर भाऊराव पाटील पथावर शेटे चौक ते शनिवार चौक मार्गे मोती चौक पर्यंत येणारे जाणारे प्रवेश बंद.

४) मोती चौक - एम.एस.ई.बी. ऑफिस समर्थ टॉकिज राधिका टॉकिज चौक ऐक्य प्रेस कॉर्नर बुधवार नाका चौक दुर्गागाता विसर्जन कृत्रीम तलाव - कै.किसन बा. आंदेकर चौक, करंजे पेठ पर्यत येणारे जाणारे सर्व वाहनांना प्रवेश बंद.

५ ) स्टेट बँक प्रतापगंजपेठ सातारा (काटदारे मसाले दुकान) - डि.सी.सी. बॅक मोती तळे पर्यत येणारे जाणारे सर्व वाहनांना प्रवेश बंद.

६) विठोबाचा नळ ते जलमंदिर कडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद

७) मोळाचा ओढा ते बुधवार नाका मार्गावरील शाहूपुरी पोलीस ठाणे ते बुधवार नाका पर्यत येणारे जाणारे सर्व वाहनांना प्रवेश बंद.

ब) समर्थ मंदिर ते चाँदणी चौक हा मार्ग हलकी वाहने तसेच अवजड वाहनांसाठी बंद राहील.

क) वाहतूक मार्गातील बदल :-

१) बोगदा-समर्थ मंदिर ते शाहू चौक हा मार्ग हलके वाहने तसेच अवजड वाहनांसाठी (एस.टी. बस सह) बंद राहील. सातारा शहरातुन सज्जनगड व कास पठार कडे जाणारी व येणारी सर्व वाहने (एस.टी. बस सह) ही गोडोली नाका, शिवराज पेट्रोलपंप, खिंडवाडी, शेंद्रे सोनगाव फाटा बोगदा मार्गे ये जा करतील.

२) मोळाचा ओढा कडून सातारा शहरात येणारी सर्व वाहने ही मोळाचा ओढा, महानुभव मठ, करंजे, भुविकास बैंक चौक, मार्गे मार्गस्थ होतील.

---३) कोटेश्वर मंदीर - राधिका टॉकीज चौक मार्गे महानुभव मठ, करंजे, भुविकास बैंक मार्गे राधिका रोड मार्गे एस.टी. स्टॅन्ड येणारी वाहने ही कोटेश्वर मंदीर शाहुपूरी मोळाचा ओढा एस.टी. स्टॅन्ड कडे येतील.

४) मोती चौकाकडे जाणारी वाहने शाहु चौक अदालत वाडा मार्गे समर्थ मंदीर मार्गस्थ होतील.

५) शेटे चौक, शनिवार चौक, जुना मोटार स्टॅन्ड मोती चौकाकडे जाण्यासाठी वाहतूक बंद असल्याने त्या परिसरात राहणाऱ्या रहिवाशांनी आपली वाहने पर्यायी मार्गाने घेऊन जावे.

६) मोळाचा ओढा ते बुधवार नाका मार्गावरील शाहूपुरी पोलीस ठाणे येथे बुधवार नाका जाण्यासाठी वाहतूक बंद असल्याने परिसरात राहणाऱ्या रहिवाशांनी आपली वाहने शाहूपुरी अथवा पर्यायी मार्गाने घेऊन जावे.

७) कास-यवतेश्वर, तसेच सज्जनगड, सोनगाव फाटा मार्गे सातारा शहरात येणाऱ्या वाहनांनी शेंद्रे, खिंडवाडी, शिवराज पेट्रोल पंप मार्गे सातारा शहरात यावे. बोगदा ते शाहु चौक मार्ग वाहतुकीसाठी पुर्णपणे बंद करणेत आला आहे.

ड) पार्किंग :-

दुर्गामाता विसर्जन/शाही सिमोल्लंघन सोहळा करीता येणारे नागरीकांनी आपली वाहने १) तालिम संघाजवळील मैदान (२)

कोटेश्वर मैदान या ठिकाणी अथवा आपल्या पर्यायी जागेत पार्किंग करावीत.

सातारा शहरातील दर्गामाता विसर्जन मिरवणूक ही राजवाडा-मोती चौक-देवी चौक-कमाणी हौद-शेटे चौक-शनिवार चौक-मोती चौक-राधिका चौक-बुधवार नाका-विसर्जन तळे या मार्गावरून जाणार असल्याने या मार्गावर (दोन चाकी चार चाकी वाहनांना पार्किंग करण्यास मनाई असेल. तसेच या भागातील रहिवासी यांनी आपली वाहने (दोन चाकी चार चाकी) या मार्गावर पार्किंग न करता अन्यत्र जागेत पार्किंग करावीत. इ)

वरील सर्व मार्गावर रुग्णवाहिका, पोलीस वाहने, अग्निशामक दलाची वाहने वगळून इतर सर्व वाहनांच्या मार्गात वरील प्रमाणे

बदल करणेत येत आहे.

तरी या बदलाची सर्व नागरीकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

प्रति संपादक

सर्व दैनिक व इले . मिडिया